**प्रेसनोट दि.२०/०३/२०१९**

**<u>बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर</u>**

बिबवेवाडी पोलीस ठाणेचे रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे १)सनि शंकर जाधव,वय २१ वर्षे रा. ६६६ चैत्रबन वसाहत बिबवेवाडी पुणे (टोळी प्रमुख) २) रोहीत काळू गाडे,वय २१ वर्षे रा.बी/६४/२६ राधाकृष्ण मंदीर समोर अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी पुणे (टोळी सदस्य) यांचेवर बिबवेवाडी पोलीस ठाणेस दुखापत करणे,गाडयांची तोडफोड करुन जनमानसात दहशत पसरवणे यांसारखे गुन्हे दाखल असल्याने महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५ प्रमाणे तडीपार प्रस्ताव मा.पोलीस उप आयुक्त सो.परिमंडळ - ५ पुणे शहर यांचेकडे सादर केला होता. त्यानुसार मा.पोलीस उप आयुक्त सो. परिमंडळ - ५ पुणे शहर यांनी नमुद आरोपातांना त्यांचे कार्यालयीन आदेश क्र.०२/२०१९,दि.१८/०३/२०१९ अन्वये कलम ५५ प्रमाणे पुणे पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हयाचे परिक्षेत्रामधुन दोन वर्षाकरीता तडीपार करणेत आलेले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त सो,परि-०५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांचे सुचने नुसार पोलीस शिपाई स्मित चव्हाण, पोलीस शिपाई रुपनर, पोलीस शिपाई शेडगे यांनी केली आहे.


